# शिक्षण उपसंचालक कार्यालय- पुणे विभाग,

१७ डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड, लाल देवळासमोर, पुणे ४११ ००१
दुरध्वनी क्र.-०२०-२६१२५६९६/२६१२२२१७ फॅक्स नं.- ०२०- २६१२२२१७
ई मेल आय डी क्र. dydpune @ gmail.com वेब साईट- www.dydepune .com

जा.क्र.शिउसं/उमाशि-२/संकीर्ण/पुवि/२०१६/ २०२९५
दिनांक. 3 OCT 2016

प्रति,

सर्व मुख्याध्यापक/प्राचार्य
(माध्यमिक/उच्च माध्यमिक)
पुणे व पिंपरी चिंचवड शहर

**विषय :- वाहतुक जनजागृती दिवस साजरा करणेबाबत**
**संदर्भ :-** मा. उपायुक्त, वाहतुक विभाग पुणे शहर

उपरोक्त संदर्भांकित विषयानुसार कळविण्यात येते की, पुणे शहर पोलिस वाहतुक शाखा यांच्या मार्फत दि ६.१०.२०१६ रोजी सकाळी ९.०० ते ११.०० या वेळेमध्ये शहरातील रस्त्यावर मानवी साखळी बनवुन प्रतिज्ञा घेत वाहतुक जनजागृती दिवस साजरा करण्याचे आयोजित करण्यात आले आहे. त्याकरिता आपल्या शाळेतील/महाविदयालयातील इ. ८ वी ते १२ वी चे विदयार्थी /विदयार्थीनी शिक्षक व आपण स्वतः या वाहतुक जनजागृती दिवस उपक्रमात (मानवी साखळी व प्रतिज्ञा) सहभागी व्हावे.

वाहतुक जनजागृती उपक्रम राबविण्यासाठी सोबत दिलेल्या तक्त्यातील पोलिस अधिका-यांशी दि ३.१०.२०१६ रोजी संपर्क साधून उपक्रमात सहभागी होणा-या विदयार्थ्यांची संख्या/वर्ग/शाळेच्या जवळचा रस्ता व चौक/विदयार्थ्यांना दयावयाचे फ्लॅग/बॅनर इत्यादी तसेच नियोजनाबाबत चर्चा करावी. व उपक्रमाचे योग्य नियोजन करावे.

सदर मानवी साखळी साठी एनएसएस/आरएसपी/स्कॉउट व गाईड या विदयार्थी पथकांचा विशेष सहभाग असावा.त्याचप्रमाणे दि ३ ते ५ ऑक्टोंबर दरम्यान खाली दिलेल्या वाहतुक नियमांवर आधारीत पुढील स्पर्धा घ्याव्यात.

**१. चित्रकला स्पर्धा, २. घोष वाक्य स्पर्धा ३. पथनाटय**

१. झेब्रा क्रॉसिंगच्या अगोदर स्टॉप लाईनवर थांबा व पादचा-यांचा आदर करा.
२. लाल सिंग्नलला थांबा.
३. हॉर्न चा वापर टाळा.
४. सिट बेल्ट / हेल्मेटचा वापर करा.
५. ॲम्ब्युलेंसला प्राधान्याने रस्ता दया.

उपरोक्त नियमांवर आधारित आपल्या शाळांमधून घेतलेल्या घोषवाक्य स्पर्धेतून निवडक ५ घोषवाक्य उदया ४ ऑक्टोंबर २०१६ रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत या कार्यालयाच्या मेल आय डी dydpune@gmail.com वर पाठवावेत.

सदर उपक्रमात सहभागी होणा-या विदयार्थ्यांची जबाबदारी पुर्णतः प्राचार्यांवर राहील याची नोंद घ्यावी. वाहतुक नियमांचे पालन करणेस स्वतःपासून सुरवात करून मानवी साखळीमध्ये जास्तीत जास्त लोकांनी सहभागी व्हावेत यासाठी आपले स्तरांवरून प्रयत्न करावा. व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

MRaut 3.10.16
(मिनाक्षी राऊत)
सहा. शिक्षण संचालक,
पुणे विभाग,पुणे.१.